# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली. जि.रत्नागिरी.
## पदवीदान समारंभ-२०२३
## जाहीर सूचनापत्र

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचा ४१ वा दीक्षांत समारंभ माहे मार्च-२०२३ मध्ये संपन्न होणार आहे. या समारंभात पदवी घेवू इच्छिणाऱ्या स्नातकांनी दिनांक १० फेब्रुवारी,२०२३ पूर्वी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठाकडे फक्त ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. ऑनलाईन अर्ज विद्यापीठ वेबसाईट **www.dbskkv.org** येथे (link) उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज हा फक्त ऑनलाईन पध्दतीनेच सादर करावयाचा आहे, कोणत्याही परीस्थितीत hard copy विद्यापीठ कार्यालयाकडे पाठविण्यात येवू नये. विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा पदवीदान समारंभाकरिता विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | स्नातकांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी शुल्क | रू. १,५००/- |
| २. | स्नातकांना पदवीदान समारंभास हजर राहून पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी शुल्क | रू. १,०००/- |

पदवी प्रमाणपत्र शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाचे वेबसाईट वरील **'Online Payment'** या टॅबवरुन **SBI-Collect** मार्फत जमा करण्यात यावे. रोख रक्कम, आय.पी.ओ. धनाकर्ष, स्विकारण्यात येणार नाहीत.

पदवी प्रमाणपत्र मागणी करणाऱ्या स्नातकांनी पदवीदान समारंभाची तारीख कळविणेकरिता व पदवी प्रमाणपत्र पाठविणेकरिता स्वतःचा संपूर्ण पत्ता (पोस्टल पिनकोडसहीत), फोन/मोबाईल क्रमांक व ई-मेल अर्जामध्ये नमूद करावा जेणेकरून पदवीदान समारंभ संपन्न झाल्यानंतर पोष्टामार्फत पदवी प्रमाणपत्र मागणी केलेल्या स्नातकांची प्रमाणपत्रे अचूक पत्त्यावर पाठविणे सोईचे होईल.

सही/-
(भ. रा. साळवी)
कुलसचिव